# ॥ ज्योतिर्मय ॥

Online Journal of Literature....

साहित्याचे विद्यापीठ

❑ पुणे ❑ वर्ष १ ले ❑ अंक १५७ वा ❑ बुधवार दि.०६ ऑगस्ट २०२५ ❑ पाने ४ ❑ मूल्य : निशुल्क (खासगी वितरणासाठी)


विशेष लेख...

## राहुल गांधींना ‘‘सर्वोच्च‘‘ फटकार

– प्रा डॉ सुधीर अग्रवाल

ज्योतिर्मय 📖 साहित्य

लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी केंद्र सरकारच्या प्रत्येक निर्णयावर दिशाभूल करणारे निराधार आणि तथ्यहीन गोष्टी वक्तव्य करत आपल्या अपरिपक्वतेचा परिचय देत आहेत. त्यांचे आतापर्यंतचे वक्तव्य भारताच्या प्रतिष्ठेला धक्का पोहोचवणाऱ्या आहेत.

सर्वोच्च न्यायालयाने परत एकदा राहुल गांधी यांना फटकारले आहे.राहुल गांधींनी भारत चीन गलवान संघर्षावर प्रश्न उपस्थित करत भारत सरकार व भारतीय सैन्यावर देशविरोधी वक्तव्य केले होते.२५ ऑगस्ट २०२२ रोजी कारगिलमध्ये भारत जोडो यात्रे दरम्यान राहुल गांधींनी एका रॅलीला संबोधित केले. गलवानमध्ये चिनी सैन्यासोबत झालेल्या हिंसक चकमकीचा संदर्भ देत राहुल गांधींनी रॅलीत दावा केला छोटा की ,लोक भारत जोडो यात्रेबद्दल बरेच काही विचारतील, पण चिनी सैनिकांनी आपल्या सैनिकांना कसे मारहाण केली यावर एकही प्रश्न विचारणार नाहीत? चीनने २००० चौरस किलोमीटर भारतीय भूमीवर कब्जा केला आहे.

२०२० मध्ये चीनने पूर्व लडाखच्या सीमावर्ती भागात सरावाच्या निमित्ताने मोठ्या संख्येने सैनिक तैनात केले होते. त्यानंतर सीमेवर अनेक ठिकाणी घुसखोरीच्या घटना घडल्या. प्रत्युत्तर म्हणून भारत सरकारनेही या भागात चीनइतकेच सैनिक तैनात केले. परिस्थिती बिघडत राहिली. अखेर १५ जून रोजी गलवान खोऱ्यात चिनी सैन्याशी चकमक झाली, ज्यामध्ये २० भारतीय सैनिक शहीद झाले आणि ४० चिनी सैनिक मारले गेले. सरकारची प्रतिक्रिया राहुल गांधींच्या विधानाला उत्तर देताना, लडाखचे तत्कालीन लेफ्टनंट गव्हर्नर (एलजी) ब्रिगेडियर (निवृत्त) बीडी यांनी उत्तर दिले होते की – चीनने भारताच्या जमिनीचा एक इंचही ताबा घेतला नाही. सरकारने देखील संसदेत यावर उत्तर दिले.मात्र राहुल गांधी यांनी सैन्यावर प्रश्न उपस्थित करत सैन्याच्या शंकेवर प्रश्न उपस्थित केला. देशहिताचा प्रश्न राष्ट्रीय सुरक्षिततेची निगडीत प्रश्न सोशल मीडियावर व्यक्त करत राहुल गांधींनी सर्व सीमा हद्दपार करून टाकली.या पार्श्वभूमीवर सर्वोच्च न्यायालयाने राहुल गांधी यांना लष्करावर भाष्य केल्याबद्दल फटकारले आहे. चीनने २००० चौरस किमी जमीन बळकावली आहे या दाव्यासाठी त्यांचा विश्वासार्ह स्रोत काय आहे असा प्रश्न न्यायालयाने विचारला. न्यायालयाने त्यांना सोशल मीडियावर नव्हे तर संसदेत बोलण्याचा सल्ला दिला. राहुल गांधी आधीच अनेक वादग्रस्त विधानांसाठी न्यायालयात गेले आहेत...

राहुल गांधींना त्यांच्या विधानांसाठी न्यायालयात नेण्याची ही पहिलीच घटना नाही. यापूर्वीही त्यांनी अनेक विधानांसाठी न्यायालयात हजेरी लावली आहे. एका प्रकरणात त्यांना शिक्षाही झाली होती, त्यानंतर त्यांचे लोकसभा सदस्यत्वही गेले.

राहुल गांधी त्यांच्या परदेश दौऱ्यात ज्या प्रकारची दिशाभूल करणारी, निराधार आणि तथ्यहीन गोष्टी बोलत आहेत ती अत्यंत लज्जास्पद आहेत आणि भारताच्या प्रतिष्ठेला धक्का पोहोचवणारी आहेत.त्यांच्या विदेशातील वक्तव्यावर देखील भारतात अनेकदा प्रश्न उपस्थित करण्यात आले. स्वातंत्र्यवीर सावरकर,आर एस एस , म गांधी यांची हत्या,गौरी लंकेश यांच्या हत्येत आर एस एस यांचा हाथ अशा अनेक प्रकरणांवर राहुल गांधी बेछूट वक्तव्य केलेले आहेत.

विरोधी पक्ष नेत्यांनी बोलताना संसदीय भाषेचा उपयोग करावा.. संसदेत किंवा विधिमंडळात प्रश्न मांडावा..ते देखील पूर्ण अभ्यासाअंती. कोणतेही वक्तव्य करताना आपण काय बोलत आहोत याचे भान असायला पाहिजे..शिवाय अभ्यासपूर्ण असावे.. ठोस पुरावे देखील असावे..मात्र राहुल गांधी उठसूट काही पण वक्तव्य करतात.

सभागृहात पंतप्रधानानंतर दुसरे प्रमुख अधिकार विरोधी पक्ष नेत्याकडे असतात. सरकारच्या कार्यावर व धोरणावर टीका करण्याची प्रमुख जबाबदारी विरोधी पक्षावर असते. सरकारी धोरणाचे व कार्यक्रमाचे वाभाडे काढून ते धोरण जनतेच्या हिताच्या दृष्टीने कसे बरोबर नाही ते विरोधी पक्ष नेता निदर्शनास आणत असतो. त्यासाठी विरोधी पक्षनेता वेगवेगळ्या मार्गांचा अवलंब करीत असतो. येणाऱ्या निवडणुकीत जनमत जागृत करून आपल्या पक्षाकडे वळविण्यासाठी तो प्रयत्नशील असतो.मात्र बोलण्यात तथ्य असायला पाहिजे. लोकशाहीमध्ये विरोधी पक्ष नेता व विरोधी पक्ष खऱ्या अर्थाने पहारेकरी म्हणून भूमिका पार पाडत असतो. हा पहारेकरी ज्या प्रमाणात सजग असेल त्या प्रमाणात लोकशाही सजग व सुदृढ बनते.याचे भान राहुल गांधींनी ठेवायला पाहिजे.

# मराठी संगीतातील वैविध्य वैशिष्ट्यपूर्ण – मुकुंद फडके

**ज्योतिर्मय 📖 साहित्य**

**सातारा – भारतातील विविध राज्यांमध्ये प्रादेशिक संगीत लोकप्रिय असले तरी मराठी संगीतात आढळणारे वैविध्य वैशिष्ट्यपूर्ण आहे. अशी विविधता इतर कोणत्याही राज्यात किंवा देशात सापडत नाही असे प्रतिपादन जेष्ठ पत्रकार मुकुंद फडके यांनी केले.**

येथील दीपलक्ष्मी नागरी सहकारी पतसंस्था आणि सुरसंगीत ग्रुप सातारा यांच्या संयुक्त विद्यमाने दीपलक्ष्मी सांस्कृतिक हॉल येथे मराठी हिंदी गीतांचा सदाबहार कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता तेव्हा प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. या कार्यक्रमाला इतर प्रमुख पाहुणे म्हणून विजय साबळे, लक्ष्मीकांत अघोर, शिरीष चिटणीस उपस्थित होते.

मराठी चित्रपट संगीतालाच नव्हे तर मराठी संगीतालाच मोठी परंपरा लाभली आहे दुर्दैवाने गेल्या काही वर्षांच्या कालावधीमध्ये मराठी संगीताच्या गुणवत्तेला ओहोटी लागली असली तरी आगामी कालावधीमध्ये पुन्हा एकदा मराठी संगीत सुवर्णकाळ पाहील अशी आशाही मुकुंद फडके यांनी यावेळी व्यक्त केली. समाजात होणाऱ्या विविध समारंभामध्ये इतर देशातील किंवा इतर राज्यातील गाणी वाजवली जातात त्याऐवजी तेथे जर मराठी गाण्यांचा वापर करण्यात आला तर मराठी संगीत अधिक लोकांपर्यंत पोहोचेल अशी अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली. विशेषतः मराठी लग्नामध्ये तथाकथित संगीत समारंभामध्ये मराठी गाणी न वाजवता पंजाबी ठेक्यांची गाणी वाजवली जातात तेव्हा दुःख होते असेही ते म्हणाले.

यावेळी कार्यक्रमाचे निर्माता, आयोजक व गायक किशोर शिंदे यांनी आपल्या ग्रुपची माहिती देताना सामाजिक उपक्रमाचा भाग म्हणून आपण हे कार्यक्रम करत असल्याचे सांगितले.




दीपलक्ष्मी नागरी सहकारी पतसंस्था चेअरमन शिरीष चिटणीस यांनी त्यांच्या या उपक्रमाचे कौतुक केले. तसेच मनोगत व्यक्त करताना ते पुढे म्हणाले, पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू रशिया देशाला भेट देण्यास गेले असता पत्रकारांनी त्यांच्याकडे राजकपूर आणि अण्णाभाऊ साठे यांना ओळखता का असे विचारले. राजकपूर यांनी गायलेली गाणी रशियन नागरिकांच्या ओठावर होती व आहेत. तसेच अण्णाभाऊ साठे यांचे मराठी साहित्य रशियन भाषेत अनुवादित झाल्याने ते त्यांचे आवडते होते व आहे. हिंदी-मराठी गीते विशेषतः जुनी जगप्रसिद्ध आहेत. अशा कराओके गाण्यांच्या कार्यक्रमामुळे सर्व धर्मीय नागरिक एकत्र येऊन आपली कला जोपासत आहेत आणि रसिक आनंद घेत आहेत हे महत्वाचे आहे.

यावेळी कार्यक्रमाचे निर्माता, आयोजक व गायक किशोर शिंदे, सहनिर्माता व गायक उमेश भोसले, पुणे येथील विनय वैद्य, स्मिता गायकवाड, सुवर्णा माने, वैष्णवी आल्हाट आणि सातारचे सागर जावळीकर सुशांत तुपे, सुधा पटवर्धन, अश्विनी कांबळे, रागिणी शिकलगार, अलिषा शिकलगार या कलाकारांनी गाणी सादर केली आणि रसिकांची वाहवा मिळवली या कार्यक्रमाचे निवेदन पुणे येथील विनय वैद्य यांनी खुमासदार शैलीत केले.

# साजिंदा श्रावण



तू धसमुसळा नाहीस आषाढासारखा. तुलना नव्हे, पण तुझ्यातलं लाघव फार आकर्षित करतं जगायला... अंहं... सुंदरतेनं जगायला. अगदी ह्या सिमेंटच्या जंगलातही. बघ ना आता तूच. तुझ्या प्रत्येक दिवसाला कुठली ना कुठली पूजा-अर्चा, उपासतापास, व्रतं-वैकल्यं, सण-वार चिकटवलेलेच दिसतात कॅलेंडरवर. भले ते करायलाच हवेत ह्याबद्दलची बंधनं आता शिथिल झालीयेत. काही जण तर थट्टाही करतात त्याबद्दल. पण गंमत बघ रे कशी, मंगळावर स्वारी केली तरीही किंवा आयटी कंपनीत उच्चपदस्थ असलो तरीही, मंगळागौरीबद्दलचं कवित्व ब-यापैकी शाबूत आहे आमचं. ह्याचं एक कारण तुझं साजिंदा असणं.तुझी अजूनही साथ असणं. एक सांगू? पूर्वी इथल्या आम्हा बायकांना घराबाहेर पडायला मिळत नसे, तेव्हा तूच झालास ह्या उंबऱ्याच्या आतल्या पावलांचा आणि भावनांचा साजिंदा, साथीदार. तुझ्या निमित्तानं का होईना, आम्हाला माहेरचं अंगण मिळायचं, अंगणात खेळायला मिळायचं. आता ती भावनिक गरज खूपच कमी झालीये. शहरी वातावरणात तर राहिलीच नाहीये, असं म्हटलं तर वावगं ठरू नये. तरीही का कुणास ठाऊक आजही मंगळागौरीकरता हॉलबुकींगची धावपळ, मंगळागौरींचे खेळ करणारे प्रोफेशनल ग्रूप इत्यादी पाहिलं की, गंमत वाटते आमच्या उत्सवप्रियतेची.




ह्या श्रावणखेळांचं, व्रत-वैकल्यांचं वैज्ञानिक, पर्यावरणीय वगैरे महत्त्व शोधून त्याबद्दल दरवर्षी कुठे ना कुठेतरी नव्यानं चर्चा-वाद घडतातच. धार्मिक श्रद्धेचं आम्हीच तुझ्याभोवती घातलेलं अवगुंठन आम्हीच बाजूला करण्याच्या प्रयत्नात दिसतो. दरवर्षी कुठल्या ना कुठल्या मासिकामध्ये, शालेय वक्तृत्व स्पर्धांमध्ये, प्रश्नपत्रिकांमध्ये श्रावणाबद्दलचे नवे विषय आणि गाण्यांमध्ये जुन्या श्रावणधारांमधला घननिळा बरसतोच. कवी लोकांचा तर तू लाडकाच.

श्रावणमासी हर्ष मानसी ह्या तुझ्याबद्दल लिहिलेल्या आद्य कवितेनंच तर आमच्या पिढीच्या आयुष्यात तुला आणलं. तेव्हापासून तुझे शिरवे कसे सरसरत येतात हे कळलं. तुझ्या इंद्रधनूच्या गोफानं तेव्हापासून बांधलेलं तोरण आजही कवितेच्या दारावर तसंच सप्तरंगी होऊन झळकतंय.

आज शहरांतल्या ह्या गगनचुंबी इमारतींच्या दाटीवाटीमध्येही केव्हातरी हा गोड इंद्रधनुषी सोहळा दिसतोच दिसतो. मग तो कुणाच्यातरी मोबाईल कॅमे-यात बंदिस्त होतो नि पटापट व्हायरलही होतो. तर तिकडे कुठल्यातरी गावात आजही पोपटी-हिरव्या भातशेतीच्या चौकोनांवर हा गोफ दिसतो. मग घट्ट कासोटा घातलेली, त्रिकोणी इरलीवाली कुणी ह्या शिवारांत गाणं गुणगुणते...

नादावला नादावला सये
पाणकळा नादावला
उमाटा सतरंगी रंगला
साजिंदा श्रावण आला

तुझ्या प्रत्येक वाराची नि व्रताची कहाणी केली इथल्या लोकसंस्कृतीनं.

आता भले त्या कहाण्या बालिश वाटतात, थोतांड वाटतात, अविश्वसनीय तर वाटतातच. तरी काही प्रमाणात का होईना त्या वाचल्या जातातच. कहाण्यांचं हे भाग्य इतर अकरा महिन्यांच्या नशिबी नाही.

कहाण्या, गाणी, लोककथा आणि नव्या साहित्यातल्या कविता ह्यांना तुझीच अखंड साथ मिळत राहिली.

अगदी दिव्यासारख्या निर्जीव वस्तूपासून ते बैलासारख्या जिवंत प्राण्यापर्यंत आणि एरवी भीतीदायक वाटणाऱ्या नागोबापासून ते पुराणातल्या कालियाच्या डोक्यावर नर्तन करणाऱ्या कन्हैय्यापर्यंत सग्गळ्यांच्या उत्सवांची रेलचेल तुझ्या ३० दिवसांत. तू उधळत असलेल्या निसर्गसौंदर्याची कमाल आणि आमच्या उत्सवप्रियतेची धमाल. हे सगळं आज २१ व्या शतकांतही वेगवेगळ्या रूपांत दिसतंय.

श्रावणा, तू ना निरागसतेच्या आड खोडकरपणा करणा-या अवखळ मुलासारखा वाटतोस. म्हणजे बघ ना, ऊन आणि पाऊस एकत्र येण्याला लहानपणी दिलेलं ते गमतीदार नाव. ते का दिलं, कुणी दिलं माहीत नाही. पण ती गंमत आजही आठवते नि हसू येतं.

तुझ्याशी फक्त आमची पोथीपुराणंच जोडली गेलीत असं नाही, तर आमचा अगदी हृदयस्थ असलेला उत्सव, आमचा स्वातंत्र्यदिनही तुझ्याशीच जोडलेला. तो अधिक नावाचा महिना पंचांगांप्रमाणे तुझ्या मागेपुढे आला तरच मग आमचं इंग्लिश कॅलेंडरही गडबडतं. पण ते केव्हातरी. नाहीतर एरवी आमचा लाडका स्वातंत्रदिनाचा उत्सव तुझ्या सरसर शिरव्यांमध्येच साजरा होतो बरं.

आमचा सुंदर तिरंगा जेव्हा निरभ्र, निळ्या आभाळात दिमाखदारपणे फडकत असतो, तेव्हा मन भरून येतं. तू निर्माण केलेल्या आल्हाददायक वातावरणामुळे

आमचा स्वातंत्र्यदिन खऱ्या अर्थानं मंगलमय होतो.

स्वतः मातीशी नातं जपणारा, ते जपणं आम्हाला शिकवणारा तू, आभाळातल्या सप्तरंगी इंद्रधनुच्या रूपात आकाशाबरोबरही नातं जोडायला शिकवतोस. आमच्या जीवनगाण्यांना आपल्या प्रत्येक दिवसातल्या, प्रत्येक क्षणाची सुरेल, सुंदर साथ देतोस तू. भले प्रत्येकाची गाणी वेगळी असतील. जी आयुष्यं

अबोल वेदना सहन करणारी असतील अशा आयुष्यांनाही जगण्याची उमेद देतोस तू.

आमच्या जीवनगाण्यांमध्ये, आमच्या जीवनकलांमध्ये तुला खूप मानाचं स्थान आहे हे माहितीये का तुला?

सावन का महिना, पवन करे सोऽरं...
शोर नही सोर, सोर...सोऽरं

अशी गीतं खास तुझ्याकरताच तर लिहिली गेली. अशा गीतांनी अनेकांची

भावविश्व समृद्ध केली. कदाचित कुणाची आयुष्याच्या साथीदाराशी गाठ बांधून दिली.

सावन के झूले पडे...

**(क्रमशः)**

## वास्तुशास्त्र पेंटिंग

लघुलेख -10



आपण ज्या वास्तूत राहतो त्या वास्तूत रहायला जाण्या अगोदर 'वास्तुशांती केली जाते. वास्तुशांती हा धार्मिक विधी आहे. यामध्ये 'वास्तु पुरुषाच्या' प्रतिमेची पूजा करून, नैऋत्य दिशेला कोप-यात त्या प्रतिमेला जमिनीमध्ये ठेवतात. या बद्दल बव्हंशी जणांना कल्पना असेल.

या प्राचीन काळापासून चालत आलेल्या परंपरेचं अनन्य साधारण महत्व आहे. या वास्तु पुरुषाच्या अनेक कथा, मिथकं ऐकायला, वाचायला मिळतात. या साऱ्या गोष्टींचा विचार करून, विविध अंगांनी अभ्यास करतांना, कांही व्यक्तींचे अनुभव देखील विचार करायला भाग पाडतात. खूपदा एखाद्या वास्तूत आपण प्रवेश केला तर आपल्याला चांगला अनुभव येत असतो. कांही वास्तूत आपल्याला खूप समाधान लाभते, तसा अनुभव आपल्याला येत असतो. काही वास्तुत आपल्याला भिती वाटते, भयाणता जाणवते. नको वाटते अशा वास्तूत थांबायला !!

खूपदा एखाद्या वास्तूत रहायला गेल्यानंतर अडथळे, संकट, आर्थिक चणचण वाढणे अशा प्रकारच्या अडचणींना सामोरे जावे लागते. तद्वतच एखाद्या वास्तूत प्रवेश केला, तरीही लाभदायक अनुभूती येतात, आर्थिक स्तर वाढतो, आनंदी वातावरण लाभते. असे अनुभव आपण्यापैकी खूप जणांनी अनुभवलेले असावेत. या विषयांवर या लेखमाले मध्ये आपण यथावकाश बोलणारच आहोत, तूर्तास वास्तुशास्त्र पेंटींग पुरता विचार करतांना एक मात्र सांगावेसे वाटते की, वास्तुची कुंडली आणि वास्तु ज्याच्या किंवा ज्यांच्या नावावर असते असले त्यांची कुंडली तसेच होरा कुंडली यांचा अभ्यास करून, त्या 'विशिष्ठ वास्तूचे अत्यंत सूक्ष्मपणे निरिक्षण नोंदवले जाते. या निरिक्षणात सकारात्मक रंग, सकारात्मक प्रतिके, आकार, अक्षर यांचा सखोल अभ्यास केला जातो. त्यात वास्तुपुरुष, वास्तुची राशी, रंग यांचाही अंतर्भाव होतो. या साऱ्याचं एक सुंदर संकलन, म्हणजे 'वास्तुशास्त्र पेंटींग... पुढील लेखात अधिक तपशीलाने आपण पाहु..!!

क्रमशः.....

द्वारा एस्.व्ही.एस्. कला प्रतिष्ठान
डॉ. गजानन शेपाळ : 98691 30238


## आकर्षक बक्षिस योजना

वास्तुशास्त्र पेंटींग या अनोख्या विषयावरील "लघु लेखमाला" एका सप्ताहातच वाचकप्रिय होऊ लागली आहे.या लघुलेख मालेचे लेखक,हे जगप्रसिद्ध वास्तुशास्त्र आणि रंग शास्त्र तज्ज्ञ आहेत. त्यांना अनेक जिज्ञासू वाचकांचे फोन होताहेत. अशा वेळी, जेव्हा क्रमशः लेख क्रम राहून जातो.या लेखमालेतील प्रत्येक लेख हा कुठल्यातरी बाबीचा संदर्भ असु शकतो.म्हणून एस्.व्ही.एस्. कला प्रतिष्ठान आणि ज्योतिर्मय यांच्या संयुक्त विद्यमाने आम्ही एक योजना आणली आहे. "वास्तुशास्त्र पेंटींग या लघुलेख मालेचे क्रमवार लेख दर महिन्याला जमा करून जो किंवा जे वाचक, ज्योतिर्मय च्या कार्यालयाकडे पाठवतील त्यापैकी भाग्यवान क्रमांकांना एस्.व्ही.एस्.कला प्रतिष्ठान कडून आकर्षक पारितोषिक प्रदान करण्यात येईल.




## जात्यावरच्या ओव्या......

सासू व सासरे
वसरी भरली देरान
तांब्याची घागर
जोत यंगती भारानं ||१९१||

सासू व सासरे
चौघेजण देर
भाग्याची सवंदर
लय दि भोगती माहेर ||१९२||

संदर्भ - शांताई इंगळे
संकलन - सौ. मनोरमा बोराडे
सहशिक्षिका, छत्रपती संभाजीनगर

# तात्या आणि सोमनाथ ...
## (माझ्या चांदणेशब्द फुलांचे या पुस्तकातील लेख)




ज्योतिर्मय साहित्य


सोमनाथ मिस्त्री किंवा मी त्यांच्या मागे त्यासाठी उभे नव्हतो. त्यांनी आपल्या कामाशी थोडी तडजोड केली असती तरी त्यांना कोणी काही म्हटलं नसतं. या प्रसंगी मला परमेश्वराची मूर्ती मोठ्या एकाग्रतेने घडवणाऱ्या कारागिराची गोष्ट नकळत आठवून गेली. तो कारागीर देवाची मूर्ती घडवताना स्वतःच्या समाधानासाठी काम करीत होता.

मी एकदा त्यांना म्हटलं, तात्या, तुम्ही खूप मेहनत घेत आहात, अतिशय मन लावून काम करत आहात. एवढं कोणी करत नाही. तात्या हसायचे. ते म्हणायचे, सर, आपण चांगलंच काम करायला हवं. घरमालक आपल्या भरवश्यावर असतो. मी काम चांगलं नाही केलं तर आज कदाचित तो काही म्हणणार नाही. पण पुढे जेव्हा त्याच्या हे लक्षात येईल तेव्हा तो आयुष्यभर माझ्या नावाने शिव्या देईल. दुसरी गोष्ट म्हणजे मी माझे काम कसे तरी केले तर माझ्या मनालाच समाधान वाटणार नाही. म्हणून काम चांगलेच करायला हवे. हे सगळे तात्या त्यांच्या बोलीभाषेत सांगत होते पण त्यातील चांगले विचार, नीतिमूल्यं शिकलेल्यानी देखील धडा घ्यावा अशी होती. तात्या फारसे शाळेत गेले नव्हते. लेखन, वाचन त्यांना फारसे येत नव्हते पण आयुष्याच्या बिन भिंतींच्या शाळेत ते जे शिकले होते ते भल्या भल्या शिकलेल्यांच्या डोळ्यात अंजन घालणारे होते.



आपले काम संपत आल्यावर याच तात्यांनी बरेच परिश्रम घेऊन उरलेल्या ग्रॅनाइटपासून एक सुंदर पोळपाट तयार केला. ते तो तयार करत असताना मी त्यांना विचारले, तात्या, तुम्ही हे काय करीत आहात ? तात्या नेहमीप्रमाणेच हसतमुखाने उद्गारले, सर, मी ताईंना देण्यासाठी एक गिफ्ट करतो आहे. जाताना तात्यांनी तो सुबक पोळपाट माझ्या सौ ना भेट दिला. तात्यांचे कपडे स्वच्छ, शुभ्र असले तरी इस्त्री केलेले नव्हते. त्यावर काही सुरकुत्या पडल्या होत्या. पण तात्यांचं मन मात्र तसंच स्वच्छ, नितळ, पारदर्शक होतं. त्यात कोणतीही अढी किंवा सुरकुती नव्हती. त्यांच्या मनाची हीच प्रसन्नता, पारदर्शकता त्यांच्या चेहऱ्यावर झळकत होती. सोमनाथ मिस्त्री कधी कधी माझ्याकडे काम करीत असे तर कधी हाताखालच्या लोकांना सूचना देऊन तो दुसऱ्या कामाला जाई. सकाळी येताना तो तात्यांना आपल्यासोबत गाडीवर घेऊन येत असे आणि संध्याकाळी जाताना सोबत घेऊन जाई. बरेचदा वेळ असला की मी सोमनाथ मिस्त्रीसोबत गप्पा मारत असे. सोमनाथ जरी सातवी आठवी पर्यंत शिकलेला असला तरी त्याचे इतिहासाचे ज्ञान चांगले होते असे मला आढळून आले. स्वातंत्र्यपूर्व काळातील इतिहास त्याला चांगलाच ज्ञात होता. त्याला मी त्याबद्दल मी विचारले. तेव्हा तो म्हणाला, सर, मला वाचनाची अतिशय आवड होती. एखादा वर्तमानपत्राचा किंवा रद्दीतला कागद जरी मिळाला तरी मी तो अधाशासारखा वाचत असे. चालू घडामोडींचेही त्याला चांगले ज्ञान होते. फक्त घरच्या परिस्थितीमुळे त्याला जास्त शिकता आले नव्हते.

(क्रमशः)



## दासबोध स्तवन



उज्वला धर्माधिकारी,
पुणे, मो. ७५८८२ ३५६४६

# उपदेशलक्षण

ज्योतिर्मय साहित्य

सहा चक्रे

मूलाधार, स्वाधिष्ठान, मणिपूर, अनाहत, विशुद्ध आणि सहस्त्रदल,

प्राण व अपान यांचे मिलन करून सुषुम्ना नावाच्या कण्यांतील सुक्ष्म नाडीच्या मार्गाने प्रत्येक चक्राचे भेदन करून प्राण मूर्ध्नि आकाशात न्यावयाचा असतो.

अजपाजय – माणूस जीवंत असेपर्यंत त्याचा श्वासोच्छ्वास अखंड चालू असतो. तो आपोआप होणारा जप आहे. श्वास आत घेताना सो व श्वास बाहेर सोडताना हम् असा सूक्ष्म नाद होतो,त्या नादावर मन एकाग्र केलें तर चोवीसतास विनासायास जप चालतो. त्यालाच अजपाजप म्हणतात.

सगुणसाकारभक्ति, निर्गुणनिराकार भक्ति, तिर्थाटन, करावे असे सांगतात.

कोणी शक्तिमार्ग सांगतात देवीची उपासना करण्याचा मार्ग,


आत्मज्ञानावाचून उपदेशाचे सर्व प्रकार व्यर्थ आहेत. आत्मज्ञानासारखे पावित्र्य दुसऱ्या कशातचं नाही. म्हणून आत्मज्ञान प्राप्त करून घ्यावे. सर्वात श्रेष्ठ आत्मज्ञानाचा उपदेश आहे. हे विसरू नये.

माणूस कोणत्याही वर्णाचा असो त्याच्या अंगी जर आत्मज्ञान स्थिरावले तर या जगात तो जन्मोजन्मी परमात्म्याचा दास होतो.

उपदेशनाम समास ४ था समाप्त

श्री राम जय राम जय जय राम

जय जय रघुवीर समर्थ



श्री ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज

# सत्समागम म्हणजे संत सांगतील त्याप्रमाणे वागणे.

ज्योतिर्मय साहित्य

कोणत्याही मंगल कार्यात सर्वाआधी गणपतीचे आवाहन करतात, आणि सगळे कार्य संपले की सर्वांचे शेवटी त्याचे विसर्जन करतात. त्याप्रमाणे अनुसंधानानेच पोथीला सुरुवात करावी आणि अनुसंधानानेच पोथीची समाप्ती करावी. लौकिक कार्यामध्ये गणपतीचे विसर्जन झाल्यावर आपण शिल्लक उरतो, पण अनुसंधानाचे विसर्जन करताना आपणही त्यात नाहीसे व्हावे. ''जसे ठेवायचे असेल तसे ठेवा, पण आपला विसर पडू देऊ नका, एवढी भीक घालावी,'' अशी गुरूच्या चरणी प्रार्थना करावी.

भगवंताला विसरून भजन करू नका. भगवंताची आठवण ठेवून भाजी जरी आणली तरी त्याचे श्रेय जास्त आहे. जगाच्या लाजेला भिऊन भगवंताला अंतर देऊ नये. 'मी कोण' याचा विचार करावा, आणि तो करण्यासाठी, 'मी नाही कोणाचा' हे बघावे. मी आप्तेष्टांचा, बायको-मुलांचा, आईबापांचा तर नाहीच, पण मी देहाचा आणि मनाचाही नाही; असे करता करता जो राहील तो मी. खरे समाधान एकपणात आहे, अद्वैतात आहे. म्हणून, द्वैताचा जनक जो अभिमान तो कमी कसा होईल हे बघावे. याकरिता, मी कर्ता नसून देव कर्ता आहे असे मानावे, सर्वांभूती भगवद्भाव पाहावा, सत्समागम करावा. सत्समागम म्हणजे सत्याचा समागम. सत्पुरुषाच्या वचनावर विश्वास ठेवून त्याप्रमाणे वृत्ती बनविणे हा खरा सत्समागम आहे. संतांवर अनन्य श्रद्धा ठेवा. त्यांच्या चालीने चाला. त्यांच्या समागमात दैन्य मानू नका. जे तुमची एकसारखी विषयातली नडच भागवतील ते संत नव्हेत. खरे संत विषयाची आसक्ती कमी करतात; अशा संताला शरण जावे. निर्विषय चित्त संतांनाच करता येते. संत हे ईश्वरदर्शनाची तळमळ उत्पन्न करतात. तळमळ उत्पन्न करून देणे हीच संतांची कामगिरी. संतांची भाषा तळमळीची असते, म्हणून ती तळमळ उत्पन्न करते. संत सांगतील त्याप्रमाणे वागावे. जग संतांशिवाय असणेच शक्य नाही. जे देहात दिसले पण वस्तुतः देहातीत राहिले ते संतच होत. आम्हांला त्यांना ओळखता येत नाही याला काय करावे ? नामाच्या योगानेच संत ओळखता येतात, जोडता येतात आणि टिकवता येतात. जो भगवंताचे नाम घेईल त्याला संत भेटेल, आणि तो त्याला भगवंताची प्राप्ती करून देईल. त्याचे कुठे अडणार नाही. पण जो नुसत्या शब्दज्ञानाच्या मागे लागेल त्याला आसक्ती सुटणार नाही, आणि त्याचे जीवन सार्थकी लागणार नाही.

संताच्या पदरात पडले की तो आपली लाज राखतो.




# हळदीच्या सेवनाने झपाट्याने कमी होईल खराब कोलेस्ट्रॉल?

ज्योतिर्मय साहित्य

१) कोलेस्टेरॉलची पातळी कमी करणे...

लो-डेन्सिटी लिपोप्रोटीन म्हणजेच कोलेस्टेरॉलला वाईट कोलेस्ट्रॉल म्हणतात आणि त्यामुळे हृदयाच्या गंभीर समस्या उद्भवू शकतात. हळदीचे सेवन केल्याने एलडीएल कोलेस्ट्रॉलची पातळी कमी होते आणि शरीरातील चांगल्या कोलेस्ट्रॉलची पातळी वाढते, ज्यामुळे आरोग्य सुधारण्यास मदत होते.

२) ऑक्सिडेशनपासून एलडीएल कोलेस्टेरॉलचे संरक्षण

एथेरोस्क्लेरोसिस तेव्हा होतो जेव्हा एलडीएल कोलेस्टेरॉल ऑक्सिजनसह प्रतिक्रिया देते, ज्यामुळे रक्ताभिसरणात अडथळा येऊ शकतो. हळदीचे सेवन केल्याने हे ऑक्सिडेशन थांबते, त्यामुळे कोलेस्ट्रॉल नियंत्रित राहते आणि रक्तवाहिन्याही निरोगी राहतात.

३) ट्रायग्लिसराइड पातळी कमी करणे

उच्च रक्तातील कोलेस्टेरॉलसह उच्च ट्रायग्लिसराइड पातळी हृदयाच्या आरोग्यास धोका निर्माण करू शकते. ट्रायग्लिसराइड देखील धमन्यांमध्ये तयार होते, ज्यामुळे कोलेस्टेरॉल रक्ताभिसरण समस्या निर्माण करणे सोपे होते. हळदीच्या वापराने ट्रायग्लिसराइडचे प्रमाण नियंत्रित करता येते.

हळदीमध्ये अँटीबॅक्टेरियल गुणधर्म असतात. खराब कोलेस्टेरॉल कमी करण्यासाठी रोज भाज्यांमध्ये हळदीचा वापर करावा. तसेच रात्री झोपण्यापूर्वी एक ग्लास दुधात चिमूटभर हळद टाकून प्यावे. याशिवाय रोज एक कप ग्रीन टी प्यायल्याने उच्च कोलेस्ट्रॉलची पातळी कमी होण्यास मदत होते.

सोरायसिस

हा एक असा त्वचाविकार आहे, जो तुम्हाला हात, पाय, पाठीवर अथवा केसांमध्ये जाणवतो. जरी याचा परिणाम तुमच्या त्वचेवर दिसत असला तरी त्याचा गंभीर परिणाम तुमच्या संपूर्ण आरोग्यावर होत असतो. या रोगामध्ये त्वचापेशीची अतिरिक्त आणि जलद गतीने वाढ होते. ज्यामुळे त्वचेवर लालसर पापुद्रे निर्माण होतात. काहींच्या त्वचेवर यामुळे लालसर चट्टे निर्माण होतात. त्वचेला प्रंचड खाज येते. काही संधोशनात असं आढळलं आहे की, सोरायसिस हा संक्रमणातून होणारा आजार नसून तो तुमच्या *प्रतिकार शक्तीमध्ये* होणाऱ्या बदलातून निर्माण होतो. आपल्या त्वचेवरील डेड स्किन निघून जाऊन नवीन पेशी निर्माण होण्यासाठी जवळजवळ २८ दिवसांचा कालावधी लागतो. मात्र सोरायसिस झालेल्या लोकांमध्ये चार ते पाच दिवसांमध्ये नवीन पेशींची निर्मिती होते. ज्यामुळे त्वचेवर या नवीन त्वचापेशींचा थर जमा होऊ लागतो. पुढे त्याचे रूपांतर खाज, लालसरपणा, चट्टे यामध्ये होत जातं. सोरायसिस हा गंभीर त्वचा रोग असल्यामुळे याबाबत तुम्हाला आधीच सर्व काही माहीत असणं आवश्यक आहे.

संकलन –
डॉ. प्रमोद ढेरे (निसर्ग उपचार तज्ञ)
पिंपरी-चिंचवड, पुणे.
आरोग्यविषयक व्याख्याते व लेखक
संपर्क – ९२ ७१ ६६९ ६६९

## ।। संत महात्म्य ।।

लेखक - मधुकर बोरीकर
9403061886

# संत ज्ञानेश्वर महाराज यांचा अभंग

ज्योतिर्मय साहित्य

इथेही आपणास विषयाकडे वळलेले मन दुःख देणारे तर ब्रह्मरूप झालेले मन हे सुख देणारे, महानंद देणारे व उन्मनी अवस्थेत गेलेले दिसून येते.

तुकाराम महाराज एका अभंगात म्हणतात

नको नको मना गुंतू माया जाळी
काळ आला जवळी ग्रासावया
काळाचीए उडी पडेल बा जेव्हा
सोडविना तेव्हा मायबाप

विषयात अडकलेले मन हे माया जाळात अडकलेले आहे तिथे त्याला गुंतू देऊ नकोस तर ते ब्रह्मरूप कर आत्म्याकडे वळव कारण केव्हाही काळ ग्रासेल असेच तुकाराम महाराज सांगतात.

समर्थ रामदास स्वामी मनाविषयी काय म्हणतात तेही आपण पाहू

मना पाप संकल्प सोडून द्यावा
मना सत्य संकल्प जीवि धरावा
मना कल्पना ते नको विषयाची
विकारी घडे हो जनी सर्व ची ची

विषयात अडकलेले मन हे पाप संकल्प करणारे असते तर सत्य संकल्प हा केवळ आत्म्यात लीन होणारे मनच करू शकते. ते करावे. मनात विषयांची कल्पना करू नये. कारण त्यामुळे विकार ग्रस्त मन होते. असेच रामदास स्वामी हे सांगतात.

संत कबीर म्हणतात कबीरा मन निर्मल करे जैसे गंगाका नीर पाछे पाछे हरी फिरे कहत कबीर कबीर मनातील विकारांचा मळ काढून मन हे गंगेच्या पाण्या सारखे निर्मळ करायला हवे. त्यासाठीची साधना करायला हवी. असे केले तर तुम्हाला परमेश्वराच्या पाठीमागे लागण्याची गरज नाही, तर उलट तोच तुमच्या पाठीमागे लागेल. असे कबीर म्हणतात.

आपले मन स्वाभाविकपणे विषयाकडे वळलेले असते. यात सतत नवनवीन कल्पना चे उन्मेश भरून येतात. इच्छा आकांक्षा जन्म घेतात व म्हणूनच असे मन हे अल्पजीवी सुख व दीर्घकाळ दुःख देणारेच ठरते या अल्पजीवी सुखाकडून शाश्वत सुखाकडे जायचे असेल तर मनाचा फेर उलट करून आत्म्याकडे वळवावा लागेल. आणि यासाठी सद्गुरुला शरण जाऊन त्यांच्या सानिध्यात कठोर साधना ही करावी लागेल. अशी साधना आपण करावी असेच संकेत ज्ञानेश्वर माऊली या अभंगातून आपणास देत आहेत.

जीवनाचे ध्येयच मुळी दुःखाची निवृत्ती व सुखाचा शाश्वत लाभ हेच आहे दुःखाचा त्याग होऊन सुखाचा लाभ कसा मिळावा याचा मूलमंत्र देणाऱ्या महान मानसोपचार तज्ञ संत श्रेष्ठ ज्ञानेश्वर माऊलींच्या चरणावर विनम्र भावाने प्रणिपात करून हा भाग इथे संपवूया

निवृत्ती ज्ञानदेव सोपान मुक्ताबाई एकनाथ नामदेव तुकाराम

जय हरी माऊली

***



## ।। निरूपण ।।

ह.भ.प. चंद्रहास शास्त्री सोनपेठकर

ज्योतिर्मय साहित्य

१६. अंबा आज माझ्या स्वप्नात आली।।
अंबेच्या कृपेची बरसात झाली
अंबा आज माझ्या स्वप्नात आली।।
अष्टभुजा की हो ती सिंहावर बसली
लेकराकडे पाहून खुदकन हसली
आता सांगा मला भीती हो कसली
रिपु करोत किती कुटिल हो चाली।।
साडी तिने हिरवी नववारी नेसली
केसात शेवंती माळ तिने माळली
पाठीवर थाप माझ्या तिने मारली
पाठीशी आहे मी मला म्हणाली।।
पाहताना पापणी माझी ओली
सरले ते शब्द मंद झाली स्वराली
जन्मांतरीची पुण्ये फळा आली
अंबा आज माझ्या स्वप्नात आली।।

## ।। श्री राम कथा ।।




वक्ते : आदरणीय श्री चैतन्य महाराज देगलूरकर

ज्योतिर्मय साहित्य

तुकोबाराय बोलले रात्री दिवस आम्हा युध्दाचा प्रसंग आपल्या अंतर मन व बाह्य मन यात युद्ध चालू असते.आमचे अंतःकरण म्हणजे रणांगण आहे. येथे सतत युद्ध चालू असते. हे युद्ध जोवर चालु आहे तोवर प्रभू अंतःकरणात कसा प्रकटेल?. मन विकल्प करते. बाह्य व्यक्तीची इथे युद्धाच्या साठी गरजच नसते.मनात विकल्प, अविद्या, कल्पना संघर्ष करतात.यातून हे घडते. कल्पना करा की तुम्ही एका बंद घरात अडकला आहात. आणि ते घर अचाणक पेटले. बाहेर पडायला रस्ता नाही. मग काय कराल? .एकच मार्ग आहे तो म्हणजे कल्पना करूच नका ना ! तुम्हाला कल्पना करा म्हटले की लगेच तुम्ही ती केली म्हणुन संकट आले.

कथा ऐकता ऐकता धावते संकलन
मधुकर बोरीकर, 9403061886

आमचा मनात विकल्पाचे युद्ध चालू असते.राम राज्यात कोणाच्याही मनात विकल्प नसत, गुन्हे नसत म्हणून न्यायालये नव्हती.तशी गरजच नसे.

अज राजा व इंदुमती राणी यांच्या पोटी दशरथ यांचा जन्म झाला. दीप शिखा (मशाल) हा दृष्टांत आहे. हा सर्वात नाजूक भावाचा मानल्या जातो. हा नाजूक दृष्टांत कालिदासाने या राजाचा विवाह प्रसंगी मांडला म्हणून त्यास दीपशिखा कालिदास असेही म्हणतात.

रावणाने अज राजावर सुद्धा आक्रमण केले होते म्हणून दशरथ विश्वामित्राने रामाला घेऊन जायला विरोध करू लागले.

(क्रमशः)

# समर्थ सेवक-मोहनबुवा रामदासी




**ज्योतिर्मय 📖 साहित्य**

महाराष्ट्राला संत वैचारिकते ने व परंपरेने समृध्द केलेले आहे. ज्ञानोबा-तुकोबांच्या शिकवणी बरोबरच समर्थ रामदास स्वामींनी दासबोध व मनाचे श्लोकाच्या माध्यमातून मानवी जीवाला देशभक्ती, ईश्वर भक्ती बरोबरच सदाचाराची शिकवण दिलेली आहे. प्रत्येक गांवात जन अधिष्ठान, बल उपासनेसाठी श्री.मारोतीरायांचे मंदिर स्थापनेची चळवळ उभी केली. समर्थ विचारांची बीजे अंकूरीत करणारे समर्थ भक्त श्री.मोहनबुवा रामदासी यांनी बालवया पासूनच दिक्षा घेतली होती!

त्यांच्या संकल्पनेतून आनंदी-नारायण कृपा न्यास ''श्री समर्थ रामदास स्वामी मठ'' खातगांव, ता.कर्जत, जिल्हा अहिल्यानगर साकारण्यात आला आहे.

समर्थभक्त श्री.मोहनबुवांचा जन्म १६ जानेवारी १९६१ रोजी खातगांव येथे झाला. प्राथमिक शिक्षणाचा आरंभ तेथेच झाला.१९७१- ७२ च्या भीषण दुष्काळ स्थितीत त्यांच्या परिवाराने मूळ गाव सोडून समर्थ कृपेमुळे सज्जनगडचा सेवेकरी म्हणून आश्रय घेतला. तेथे बालवयातच मोहनबुवांची समर्थ विचाराची जडन -घडन झाली. निश्सिम समर्थ भक्त श्रीधर स्वामींचा सहवास तेथेच लाभला.सज्जनगडाच्या दररोज ८०० पायर्या उतरणे व चढणे करत छ.श्री.शिवाजी हायस्कूल परळी मधून शालेय शिक्षण पूर्ण केले.तेथेच वेदशाळेतच वेद आध्यायन पूर्ण केले. व समर्थ विचारातून ध्येय मार्गाची दिशा ठरवली.

सकळां चे करावे पारिपत्य
आलीयांचे करावे आतिथ्य ।।

या समर्थ विचाराने प्रेरित होऊन सन २००० पासून श्री.रामदास स्वामी संस्थानचे व्यवस्थापक पदी व्रतस्त व अविरतपणे १६ वर्षे सेवा केली. समर्थ विचारांचा प्रसार व प्रचाराची धूरा समर्थपणे सांभाळली.

श्री.रामदास स्वामी संस्थानचा समर्थ पादुका भिक्षा दौरा वर्षातून दोन महिने आयोजित केला जातो. महाराष्ट्राबाहेर एकूण ४० रामदासी प्रचार व प्रसारा साठी जातात. या दौऱ्याचे नियोजन व व्यवस्थापन व नियोजन एक तपापासून मोहनबुवा कडे होते!

समर्थ विचाराचे रघुवीर समर्थ मासिकाचे मानद संपादन कार्य तसेच अनेक मासिकांमध्ये लेखन सेवा बुवांनी केलेली आहे! स्टार माझा वहिनीवर ''देव माझा'' सदराखाली मनाचे श्लोक व दासबोधाचे निरुपण सेवा अनेक वर्षा पासून रसिकांच्या अंतर्मना पर्यंत पोहचण्याचे पवित्र कार्य मोहनबुवां नी प्रभावीपणे कार्य केले!

समर्थ साहित्य प्रचार नविधा भक्ती, दासबोध वाचन, मनाचे श्लोकाच्या

**शाम वा. कुलकर्णी,
बावधन पुणे**

ऑडिओ, व्हिडिओ सी.डी.च्या माध्यमातून आपल्या मधूर स्वराद्वारे मोहन बुवांनी निर्मीती केलेली आहे!

सातारा नभोवाणी केद्राच्या माध्यमातून ''सापेक्ष समर्थांचा'' आणि ''समर्थ वाणी'' लोकप्रिय कार्यक्रम मोहन बुवांनी प्रभावी वाणी द्वारे केले आहेत.

दैनिक सामना या वृत्तपत्रातून ''दृष्टांत'' तर दै.लोकमत मधून ''भावधारा'' सदरा खाली लेखन केले आहे.

प्रकाशित साहित्य- ''दासांचे चिंतन''- सन २०१०

समर्थांचे बालपन-'', ११ मारुती दर्शन-सन २०११

समर्थ रामदास स्वामी आणि त्यांच्या शिष्य वर्गाच्या वास्तव्याने पावन झालेल्या खातगांव परिसरात समर्थ मठाचे पूनरुजीवन करण्याचे कार्य खातगांवचे रहिवासी असलेले मोहनबुवा रामदासी व कुटुंबीयांच्या मनात आले व समर्थांच्या विचाराचा प्रसार व्हावा हा हेतू मनी बाळगून सन २०१० मध्ये मोहनबुवा, त्यांचे ज्येष्ठ बंधू अरुण नारायण कुलकर्णी व भगिनी शारदाताई व स्मितााताई यांनी एकमताने दान पत्र करत ''आनंदी-नारायण कृपा न्यास''ची स्थापना केली व २०११ मध्ये श्री समर्थ रामदास स्वामी मठाची स्थापना ही झाली.

खातगांव श्री. समर्थ रामदास स्वामी मठा तर्फे निसर्गरम्य परिसरात होणारे कार्य-

बालसंस्कार/ तरुणासाठी बलोपसना. प्रापंचिका साठी साधना शिबीराचे आयोजन.पंचक्रोषी तील ग्रामस्था साठी आरोग्य तपासणी शिबीरे. गोमाता संरक्षण योजनेखाली गोशाळा. देशी गोवंश रक्षण. कुपोशीत बालकांसाठी विशेष कार्यक्रम. या प्रकारचे अनेक नाविन्यपूर्ण उपक्रम राबवले जातात.

रामदास स्वामींच्या प्रासादिक पादुकांचे पूजन या मठात श्रद्धापूर्वक केले जाते. या पादुका मठाचे प्रनेते मोहनबुवांना प्राप्त झालेल्या आहेत. त्या पवित्र पादुकांचे कालमापन शास्त्रीय पध्दतीने समर्थभक्तांच्या आग्रहाने करण्यात आले होते. कोअर हेरिटेज या ऐतिहासिक वास्तू परिक्षणाच्या माध्यमातून ३०० ते ३५० वर्षे जून्या असल्याचे सिध्द झाले ! त्यामुळे पादुका समर्थांच्याच असल्याच्या गृहितकाला पुष्टी मिळते.

सन १९८१ मध्ये मोहन बुवांनी भारत भ्रमंतीचा संकल्प केला होता. त्या कालावधीत श्रीक्षेत्र गरुडेश्वर गुजरात येथे नर्मदे काठी ग्रंथराज दासबोधाचे पारायण करत असतांना एक तेजस्वी स्वरुपाचा रामदासी भेटला. त्यांनी मोहन बुवांची चौकशी केली.व त्यांनी आपल्या झोळी तून या पादुका देऊन नित्य पूजा करत जा म्हणत ते रामदासी दिसेनासे झाले. त्याच पादुका मठातील दैनंदिन पूजनासाठी असतात.

मनी धरावे ते होते । विघ्न अवधेची नासोनि जाते ।
कृपा केलीया रघुनाथे । प्रचीत येते ।।

समर्थ भक्त मोहनबुवांच्या कार्याचा गौरव अनेक पुरस्काराने झाला., सातारा समाजभूषन-२००६., -दे.ऋग्वेदी ब्राह्मण संघ यांचा ''काशी केशव दासबोध'' पुरस्कार - २००७., मोरया गोसावी संस्थान, चिंचवड पुरस्कार २००९., श्रीराम जनसेवा पुरस्कार, योगतज्ञ प.पू. दादाजी वैशंपायन पुरस्कार-२०१०., संतमित्रा पुरस्कार -२०११., विश्वशांती पुरस्कार -२०१७., मराठी साहित्य परिषद पुणे. शाखा यांचा जीवन गौरव पुरस्कार- जूलै२०१९.

जय जय रघुवीरसमर्थ!

***

# आर्थिक साक्षरतेसाठी भेलके महाविद्यालयात सेबी मार्गदर्शक तत्वांवर व्याख्यान



**ज्योतिर्मय 📖 साहित्य**

**भोर** – शंकरराव भेलके महाविद्यालय, नसरापूर येथील वाणिज्य व अर्थशास्त्र विभागाच्या वतीने 'आर्थिक साक्षरता उपक्रम' अंतर्गत 'सेबीची मार्गदर्शक तत्वे' या विषयावर मंगळवार, दिनांक ५ ऑगस्ट २०२५ रोजी विशेष ऑनलाइन व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. तुषार शितोळे होते.

प्रास्ताविक भाषणात डॉ. शितोळे यांनी आर्थिक साक्षरतेचे महत्व अधोरेखित करताना सांगितले की, ''आर्थिक साक्षरता ही काळाची गरज आहे. जितक्या लवकर आर्थिक नियोजन करता येईल तितके उत्तम. तरुण पिढीने आर्थिकदृष्ट्या जागरूक होणे अत्यावश्यक आहे, जेणेकरून भविष्यातील आर्थिक अडचणींना तोंड देणे सोपे जाईल. त्यांनी कार्यक्रमाची पार्श्वभूमी स्पष्ट करत विद्यार्थ्यांना अर्थ नियोजनाचे शिक्षण घेण्याचे आवाहन केले.

कार्यक्रमात सेबी स्मार्ट ट्रेनर रितू बाला यांनी ऑनलाइन झूम ऍपच्या माध्यमातून मार्गदर्शन केले. त्यांनी आपल्या सखोल व मुद्देसूद सादरीकरणात खालील विषयांवर माहिती दिली.

१. ध्येय नियोजन व आर्थिक नियोजन २.महागाई व कर आकारणीचे परिणाम ३. चक्रवाढीची ताकद व म्युच्युअल फंडांची प्राथमिक माहिती४. निवृत्ती नियोजन व गुंतवणुकीचे सहा आधारस्तंभ खर्च, उत्पन्न, बजेटिंग, बचत, गुंतवणूक व कर्ज ४.कर्ज सापळा व त्यापासून बचावाचे मार्ग
५.अफरातफरीच्या प्रकार-मास मार्केटिंग, क्रेडिट/डेबिट कार्ड फसवणूक, फिशिंग लिंक्स, विशिंग कॉल्स, लॉटरी घोटाळे, एटीएम स्कीमिंग इ.६.अल्प, मध्यम व दीर्घकालीन गुंतवणुकीची नीती ७.सेबी व एनएसईचे नियम व संरक्षणात्मक उपाय.

विद्यार्थ्यांमध्ये आर्थिक साक्षरतेविषयी जागरूकता निर्माण व्हावी या उद्देशाने सदर व्याख्यानाचे प्रक्षेपण प्रोजेक्टर व टूल्स च्या साहाय्याने महाविद्यालयात करण्यात आले. या कार्यक्रमाला महाविद्यालयातील विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाचे संयोजन डॉ. सचिन घाडगे, प्रा. महेश कोळपे, प्रा. दयानंद जाधवर, प्रा. भूषण समगीर, प्रा. संदीप लांडगे, प्रा. पौर्णिमा कारळे, डॉ. आर. बी. ढाकणे, डॉ. गणपत आवटे, प्रा. सहदेव रोडे, डॉ. जगदीश शेवते, प्रा. भगवान गावित यांनी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. तुषार शितोळे यांच्या मार्गदर्शनाखाली केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. माऊली कोंडे यांनी केले, तर आभार प्रदर्शन प्रा. वैष्णवी कोंडे यांनी केले. हा उपक्रम विद्यार्थ्यांमध्ये आर्थिक शिस्त, नियोजन आणि सावधगिरी या मूल्यांचा बीजारोपण करणारा ठरला.




## फुलमाला....




नील कमळ ...


चिखलात उगवते नील कमळाचे सुंदर फूल
त्याचा सुगंध इतका गहिरा त्याची सहज पडते
भूल ...

या फुलांचा असतो श्री कृष्णासारखा घननीळ रंग
फुलांच्या मोहकतेवर द्रौपदीही म्हणे होतस दंग...

नील कमळ क्वचित दिसते पण जिथे उगवते तिथे
येते प्रसन्नता आणि शुभता..
हे फूल विष्णु आणि दुर्गेला वाहता पुण्य प्राप्त होते
अशी आहे याची मान्यता...

सौ. माधुरी म. इनामदार, मिरज..





विश्वास देशपांडे,
चाळीसगाव
मो. ९४०३७४९९३२

## रवींद्रनाथ टागोर : वारसा आणि कार्य

**ज्योतिर्मय 📖 साहित्य**

## कर्मयोगी रवींद्रनाथ

त्यांच्याबद्दल गुरुदेव म्हणतात, '' हे माझे सारे कर्मसंगी दारिद्र्यात दिवस काढत होते. इथे केवळ कामाचे कष्टच नव्हे तर शारीरिक- सांसारिक - किती प्रकारचे दैन्य भोगावे लागले त्यांना. प्रलोभनाचा तर इथे प्रश्नच नव्हता. जीवनयात्रेला आवश्यक सोयी नव्हत्या. प्रसिद्धीचीच काय पण भावी उत्कर्षाची ही आशा नव्हती. हल्ली वर्तमानपत्रात जसे प्रसिद्धीचे ढोल बडवले जातात, त्याचाही त्याकाळी कुठे मागमूस नव्हता. लोकांना कधीच कळणार नाही अशा हालात राहून ती दुःखी लपवीत त्यांनी तपस्या केली. पैशाचा किती अभाव होता याची तर कोणालाच कल्पना येणार नाही. त्यांच्या त्या कष्टाची कहाणी कुणाला कळणार नाही की कोणी त्यांचा इतिहासही लिहिणार नाही...''

ही माणसे अत्यंत ध्येयवादी आणि समर्पित वृत्तीने जगली स्वतः गुरुदेव तर किती निरपेक्ष होते नोबेल पुरस्काराची मिळालेली लक्षावधी रुपयांची रक्कम त्यांनी कोणताही लोभ न ठेवता शांतीनिकेतनला अर्पण केली त्यांच्या साऱ्या सहकाऱ्यांनी शांतिनिकेतनसाठी आणि गुरुदेवांच्या कार्यासाठी प्रचंड त्याग केला. या सगळ्यांची तपस्या आणि दिलेली आहुती एवढी मोठी होती की त्याची तुलना कशाशीच करता येणार नाही. परिस्थिती कशीही असो, पण आपल्या विद्यार्थ्यांचे जीवन असे घडवायचे की तो पुढे कोणत्याही परिस्थितीत आनंदाने, समाधानाने जगू शकेल आणि जीवनात यशस्वी होईल हे त्यांचे ध्येय होते. आजच्या काळात भरपूर वेतन घेऊन आपल्या कामाला न्याय न देऊ शकणाऱ्यांनी गुरुदेवांच्या आश्रमातील या सहकाऱ्यांचा त्याग डोळ्यासमोर ठेवला पाहिजे तरच त्यांना आपल्या कर्तव्याची थोडी तरी जाणीव होऊ शकेल.

गुरुदेवांना न्यूयॉर्कमध्ये भेटलेला एल्म हर्स्ट हा हा तरुण त्यांना भेटल्यानंतर अंतर्बाह्य बदलून गेला. गुरुदेवांकडून कोणतेही पैशांची अपेक्षा न करता तो भारतात आला आणि ग्राम विकासाचे कार्य करू लागला. स्वतःचे घर साफसूफ करण्यापासून त्याच्या कामाची सुरुवात झाली. रॉबरी ऑफ द सॉइल हा संशोधन पर प्रबंध त्याने लिहिला. त्यात त्याने ग्रामीण भागातील दुरावस्थेचे चित्र संशोधन करून मांडले व त्यावर उपाय सुचवले.

कोणतेही काम करताना त्यामध्ये सौंदर्यदृष्टी ठेवून केले असता ते चांगले होते असा गुरुदेवांचा नेहमीच आग्रह असायचा. त्यामुळे शांतिनिकेतन किंवा श्रीनिकेतनमधील सर्व कामांना व्यवहार्यतेसोबतच सौंदर्यदृष्टीची जोड लाभली होती.

गुरुदेवांना कामाची आणि शिकवण्याची ठोकळे बंद विभागणी कधीही मान्य नव्हती. त्यांच्या शांतीनिकेतनमधील लायब्ररीत कारकुनी करणारे चैतीबाबू संध्याकाळी संगीत भवनात दिलरुबा घेऊन विद्यार्थ्यांसमोर उत्साहाने हजर असायचे. ते वयाने कितीही थकलेले असले तरी त्यांचा हा दिनक्रम अखंडित सुरू होता. त्यांच्या शाळेतील चित्रकलेचे प्राचार्य दिनकर कौशिक दा संध्याकाळी मुलामुलींच्या मेळाव्यात गाण्याच्या बैठकीला हजर असायचे. अमुक एक विषय किंवा विभाग तेवढा माझा. बाकीच्या गोष्टींशी माझा काही संबंध नाही अशासारख्या विचारांना गुरुदेवांचा कायमच विरोध होता. **(क्रमशः)**

## ऑनलाईन औषधोपचार



आता सर्वकाही झाले आहे ऑनलाईन मग आजारपणात पण घरबसल्या औषधोपचार घ्या, कुठेही जाण्याची गरज नाही, वेळ व पैसा वाचवा 100 % खात्रीशीर इलाज, गुप्तरोग, शारीरिक थकवा, बऱ्याच गोष्टी कोणालाही सांगण्यास लाज वाटते अशा वेळेस फक्त फोनवर तुम्ही तुमचा आजार सांगू शकता व त्यावर आयुर्वेदिक पद्धतीने हमाखास उपाय केला जाईल, पोस्टाने औषधं पाठविल्या जातील, प्रसिद्ध आयुर्वेदाचार्य डॉ. शेख ए एच, 37 वर्षाचा अनुभव, 200 पेक्षा अधिक पुरस्कार प्राप्त, 2 लाखांपेक्षा अधिक विविध लैंगिक समस्यग्रस्त रुग्णांवर यशस्वी उपचार, आतापर्यंत ५ ऑनररी डॉक्टरेटच्या पदव्या देऊन विविध संस्थांनी त्यांना सन्मानित केलेले आहे. त्यांच्या या कार्याची नोंद लंडन बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड, ओयासिक बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड, एशियन बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड, हुज-हू-इन एशिया रेकॉर्डस् मध्ये विक्रमी नोंद झालेली आहे. सेक्स विषयक कोणताही प्रॉब्लेम असो फक्त एकदा फोन करा व मार्गदर्शन घ्या. व तुमचे प्रश्न सोडवा.

Dr Shaikh A H - 98606 99906



## इंदापूरी निखारे

## कटू वास्तव....



**ज्योतिर्मय 📖 साहित्य**

एक सुंदर कुटुंब...
सुंदर कुटुंब म्हणजे?
चांगली बायको, चांगला नवरा...
एक मुलगा, एक मुलगी... नवरा, नोकरी दिवसभर... बायको, घरकाम दिवसभर...
मुलगा, मुलगी शाळा, अभ्यास, खेळ...
कोणत्यातरी सोसायटीत वन बी एच के किंवा
टू बी एच के फ्लॅट... आणि एक टू व्हीलर...
आणि फोर व्हीलर स्वप्न !
इतर अशीच वगैरे वगैरे...
दीड दोनशे फ्लॅट असलेली सोसायटी...
एक दिवस अचानक...
अत्यंत प्रभावी आणि अत्यंत कार्यक्षम यंत्रणा...
फ्लॅट नंबर ३९३ समोर...
बेल वाजवली जाते... नवरा दार उघडतो...
यंत्रणेचा आदेश
तपासणी साठी... तो म्हणाला...
शुगर नाही, बी पी नाही, हृदयविकार नाही,
मी ठणठणीत...
तशी पूर्ण सोसायटी निगेटिव्ह! यंत्रणा ऐकत नाही... नाईलाजाने तो, बाईकवर तपासणीसाठी...
मेन गेट मधून बाहेर पडताना
क्षणभर थांबून...
गच्चीत उभे असलेल्या मुलगा, मुलगी, बायकोला...
नेहमप्रमाणेच बाय बाय करून...
१०/१५ दिवसांनी अँब्युलन्स
सोसायटीच्या गेट समोर!
वॉचमनला ड्रायव्हर सांगतो...
ए त्या ३९३ वालीला सांग... बॉडी आणली आहे...
पाहून घे एकदा... ती आणि मुलं गेटवर...
प्रचंड सुरक्षित अंतर ठेऊन !
सोसायटीचा अध्यक्ष, चिटणीस...
ताई, गेट पासूनच बरं !
फुले फेका... नाहीतर...
ती आणि मुले कशीबशी फुले
अर्पण करण्याचा प्रयत्न...
ड्रायव्हर शक्य तेवढ्या हळू ओरडून...
ए ताई, दे इकडे, बॉडी जाळताना टाकतो अंगावर...
असहाय्य, शून्यात असलेल्या नजरे कडे...
भावहिन निष्ठुर चेहरे... संवेदना नष्ट झालेले...
अतिशय असंवेदनशील भावनेने भारून गेलेले अनेक... आणि त्यांच्या प्रचंड धावपळीत...
अतिशय निर्लज्ज पणे... यंत्रणेकडून सोसायटीचे
खूप खूप अभिनंदन...
आणि त्यापेक्षा जास्त निर्लज्ज पणे...
सोसायटी कडून यंत्रणेचे खूप खूप कौतुक...
अगदी अभिनंदनाचा वर्षाव
एव्हढ्या ५००/६०० लोकांमधून...
अचूक पॉझिटिव्ह रुग्ण
शोधून काढला... एका मोठ्या संकटातून मुक्तता...
एक युद्ध जिंकल्याचा आनंद...
असे अचूक पॉझिटिव्ह, निगेटिव्ह...
अगदी अचूक शोधून काढतात...
रात्री सोसायटीच्या क्लब हाऊस मधून...
कोणाचा तरी वाढदिवस !
हैप्पी बर्थडेच्या डी जे संगीत किंचाळ्या...
दुःख! थोडी कुठेतरी राहिलेल्या मोजक्या जागेत...
५००/६०० स्क्वेर फुटात दुर्लक्षित, अडगळीत...
शेवटच्या घटका! अस्तित्व पण राहणार नाही...
या चिंतेत...
कोणतीतरी अशीच एखादी घटना...
वाचलेली, ऐकलेली! कधी कधी
प्रत्यक्ष पाहिलेली... तरीपण
माहीत नसलेली, माहीत असूनही...
ओके, पण काही प्रश्न विचारायचे आहेत...
प्रश्न विचारायचेच नाही...
अक्कल आहे ना?
उत्तरे तुम्हालाच शोधायची !

# पोशिंदा

ज्योतिर्मय साहित्य

(मागील अंकावरून)

एक रुपयाची काटकसर करणाऱ्या आणि लाखो रुपये शेतात घालणाऱ्या दोन्ही गोष्टींचा मेळ घालताना मनाचा गुंता झाल्याशिवाय राहत नाही. कितीही अडचण असो कोणत्याही संकटात कंबर कसून उभा राहणाऱ्या माझ्या बळीराजाला सलाम आणि बळीचे राज्य येवो हीच प्रामाणिक इच्छा.

दु:ख संकट, महामारीत उभा राहतो जगाचा पोशिंदा, मातीत गाळून घाम, उगवितो सोनं, शेतमालाला त्याच्या भाव मिळून उगवावा त्याच्यासाठी एक सोनियाचा दिन.

एवढीच प्रार्थना.

जय जवान जय किसान लालबहादूर शास्त्री यांची ही घोषणा म्हणजे त्यांनी भारताला दिलेला प्रगतीचा मूलमंत्र आहे. आपल्या देशाच्या प्रगतीचे दोन आधारस्तंभ आहेत. यातील एक जवान आणि दुसरा म्हणजे किसान यांच्या आधारावर जनता विकासाच्या वाटेने वाटचाल करत असते.

काळया आईशी इमान राखत घाम गाळून सोने पिकवणारा शेतकरी कष्ट करत देशासाठी कष्टत असतो. खरं सांगायचे तर शेतकरी राजा खूप मोठ्या मनाचा असतो. इथं राजा हा उल्लेख मुद्दाम केला आहे.की आपण एक रुपया खर्च करताना आपण विचार करत असतो. पण लहरी निसर्गाच्या अनेक तऱ्हा सहन करत शेतात लाखो रुपये घालून येणाऱ्या पिकाची वाट पाहणारा फक्त शेतकरीच असतो.

विचार करायचे झाले तर, अविश्रांत मेहनत करणाऱ्या शेतकऱ्यांवर देशाची सुबत्ता व समृद्धी अवलंबून आहे. त्यांच्या हातावर सर्व देश वासियांची पोटे आधारलेली आहेत. भारतीय शेतकरी हा लाखांचा पोशिंदा आहे .लाख गेले तरी चालतील पण लाखांचा पोशिंदा जगायला हवा असे मला तरी वाटते.

खूप दिवसापासून मनात एक खदखदत असलेले चित्र...!

सो... सो...करत सुटलेला तो वारा, वावटळीसारखा घोंघावत येतोय, खाली जमिनीवर असलेल्या* *वाळलेल्या गवताच्या काड्या कडकड मोडून पडत आहे, सगळीकडे कोरडे ठणंठणीत अगदी घशाला कोरड पडून त्याच्यातून न फुटणारा आवाज, दूरवर पसरलेले ओसाड वाळवंट अन् त्यामध्ये

वाळलेली एकेरी काटेरी बाभळ अगदी कातडी सोलवटून टाकणारी. का माहीत नाही पण त्यात दिसणारी ती केविलवाणी प्रतिमा..!

आपण शेतकऱ्यांची सुखदुखे समजून घेऊन शेतकऱ्याला समाधान देणे हे जनतेचे त्यांच्या प्रति आद्य कर्तव्य आहे. शेतकऱ्यांना विशेष सवलती दिल्या गेल्या पाहिजे. योग्य वेळी कर्ज पुरवठा, खते ,जंतुनाशके, बी बियाणे यांची उपलब्धता होणे गरजेचे आहे. आणि सर्वात महत्वाचा मुद्दा शेतकऱ्याच्या मालाला योग्य भाव मिळणे गरजेचे आहे. त्याचा भाव त्यांनीच ठरवण्याचा अधिकार शेतकऱ्याला दिला गेला पाहिजे.

आजच्या घडीला खर तर व्यापारी आणि सरकार यांच्या कात्रीत सापडलेला शेतकरी निराशेच्या खाईत बुडत जाताना दिसून येतोय.

रात्रीच्या त्या किर्र अंधारात चिखलात रुतलेला काटा ओरखडे काढून जणू त्याला रक्त बंबाळ करत असतो ना तेंव्हा त्याच्या हाताच्या ओंजळीतल्या रेषा आणि त्यावर लिहिलेली त्याच्या कर्म कहाणीची कथा एका एका रक्ताच्या थेंबातून उमटत असते. त्याच्या बनियानाला पडलेली छिद्रे त्याच्या फाटक्या नशिबाची निशाणी अधोरेखित करत असते.



हे काय नवीन आहे..! हे नवीन नाही,पण आपण सर्वांनी विचार केला तर शेतकऱ्यांच्या मालाला भाव देताना आपण का विचार करतो. अशा कितीतरी गोष्टी आहेत. काही वेळा लोक हॉटेल मध्ये जातात ठीक आहे हॉटेल मध्ये गेल्यानंतर घरातील स्त्री ला काही वेळासाठी आनंद मिळतो कुटुंबासोबत वेळ घालवतो .संवाद साधला जातो. ही गोष्ट जितकी चांगली आहे.

यातून एक सांगायचे की जेव्हा तेथील अन्न वाया जाते तेव्हा आपण त्या एकदोन रुपयांचा विचार करतो का? जेंव्हा एखादी गोष्ट हौसेने करतो तेंव्हा विचार करतो का? अशा अनेक ठिकाणी पैशाचा अपव्यय होतो.काही ठिकाणी काहीही आधार नसतो.किंवा त्यामागील पूर्ण माहिती नसते तरीही डोळे झाकून आपण विश्वास ठेवत असतो.अनेक उदाहरण आहेत त्याचा स्पष्ट उल्लेख इथे करत नाही. कोणाला दोष ही नाही द्यायचा .काही ठिकाणी विचार करून उपयोग नाही .मग हा नियम शेतकऱ्याच्या बाबतीत का?

हे फक्त एक उदाहरण म्हणून फक्त बर का..! अशी कितीतरी उदाहरणे आहेत. कोणाच्या भावना दुखवायच्या नाहीत. पण एक वाटते की माझ्या बळीराजाला ही या सर्वाचा भाग होऊ द्या ना. विचार करायचे झाले तर सुरुवातीला भांडवल घालून काबाड कष्ट करून हंगामी पीक घेतले जाते.शेतकऱ्याला त्याच्या कष्टाचे मोल सुद्धा मिळत नाही.

शेतकऱ्याच्या जागेवर जाऊन विचार केला तर त्या गोष्टी कडे बघण्याचा दृष्टिकोन बदलू शकतो. कष्टाचा विचार केला तर एकटा मनुष्य काही करू शकत नाही.त्याला मनुष्य बळ लागतेच लागते.बारकाईने विचार करायचे झाले तर सर्वांनी नोकरी करायचा विचार केला तर या निसर्गाचा समतोल कसा राखला जाईल. हा ही खूप गहन आणि अत्यंत नाजूक विषय आहे.

पोशिंदा या विषयात आपले पशुधन आणि किसान दोहोंचा समन्वय साधण्याचा प्रयत्न केला आहे. त्यामुळेलेखन विस्तृत झाले आहे.यांच्या बाबतीत लिहिण्यासारखे अजून खूप काही आहे.काही अयोग्य असल्यास क्षमस्व आता इथे थांबते.




# इतिहास संकलनचा उत्सव : देवगिरी प्रांत अधिवेशनात चार इतिहास संशोधकांचा सन्मान

ज्योतिर्मय साहित्य

**कडा –** इतिहास म्हणजे केवळ भूतकाळाचे संकलन नव्हे, तर राष्ट्राच्या स्मृतींचे श्रद्धा व प्रेरणास्थान. त्या स्मृतींच्या संजीवनीने प्रेरित होत महाराष्ट्रातील इतिहासप्रेमींनी संशोधनाचे व्रत घेतलेली संस्था म्हणजे इतिहास संकलन संस्था, महाराष्ट्र (देवगिरी प्रांत). या संस्थेच्या वतीने आयोजित केलेले तिसरे प्रांतीय अधिवेशन ही केवळ एक शैक्षणिक परंपरा नव्हे, तर इतिहासप्रेमाचा उत्सव ठरणार आहे. १२ व १३ ऑगस्ट २०२५ या दिवशी श्री सिद्धेश्वर महाविद्यालय, माजलगाव, जिल्हा बीड येथे होणाऱ्या या भव्य अधिवेशनात इतिहास संशोधन, समाजप्रबोधन, शिक्षण आणि संघटन क्षेत्रात लक्षणीय योगदान देणाऱ्या चार मान्यवरांना प्रतिष्ठेचे पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहेत.

या दोन दिवसीय राष्ट्रीय अधिवेशनाची संकल्पना देखील अत्यंत प्रेरणादायी आहे ''पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर: नेतृत्व, सामाजिक सुधारणा आणि सांस्कृतिक पुनर्जागरण''. या विषयाच्या अनुषंगाने विविध परिसंवाद, शोध निबंध व संवाद सत्रांचे आयोजन करण्यात आले आहे. अधिवेशनाचे आयोजन इतिहास विभाग, श्री सिद्धेश्वर महाविद्यालय, माजलगाव यांच्यातर्फे अखिल भारतीय इतिहास संकलन योजना (), नवी दिल्ली संलग्न इतिहास संकलन संस्था महाराष्ट्र देवगिरी प्रांत व भारतीय इतिहास अनुसंधान परिषद, (), नवी दिल्ली यांच्या सहकार्याने होत आहे.

या अधिवेशनाचे प्रमुख आकर्षण म्हणजे संस्थेच्या वतीने देण्यात येणारे चार पुरस्कार. ही पुरस्कार परंपरा केवळ गौरवासाठी नव्हे, तर इतिहाससंशोधनातील मूल्यमापन, मूल्यप्रवणता आणि प्रेरणेसाठीचा एक महत्त्वाचा सन्मान आहे. सु. ग. जोशी (लातूर) यांना 'बाबासाहेब आपटे ज्येष्ठ इतिहास संशोधक पुरस्कार', डॉ. प्रभाकर देव (नांदेड) यांना 'स्व. मोरोपंत पिंगळे शैक्षणिक कार्य पुरस्कार', प्रा.डॉ.राजेंद्र नन्नवरे (जळगाव) यांना 'स्व. हरिभाऊ वाकणकर शिक्षक पुरस्कार', तर हेमंत पोखरणा (कडा, बीड) यांना 'स्व.डॉ. सतीश मित्तल संघटन पुरस्कार' प्रदान करण्यात येणार आहे. हे सर्व पुरस्कार संस्थेच्या प्रांत कार्यकारिणीच्या बैठकीत एकमताने जाहीर करण्यात आले आहेत.

या पुरस्कार प्रक्रियेचे संपूर्ण नेतृत्व आणि संकल्पना डॉ. राधाकृष्ण जोशी, संस्थापक अध्यक्ष व पश्चिम क्षेत्रीय संघटन सचिव, अखिल भारतीय इतिहास संकलन योजना, नवी दिल्ली व प्रांताध्यक्ष डॉ. मुकुंद देवर्षी यांनी पार पाडली. डॉ मुकुंद देवर्षी यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या कार्यकारिणीच्या बैठकीत हा ऐतिहासिक निर्णय झाला. या कार्यकारिणीमध्ये राज्यभरातील ख्यातनाम संशोधक, इतिहासकार आणि शिक्षणतज्ज्ञांचा समावेश आहे. यामध्ये प्रा. धनंजय जवळेकर (सचिव), डॉ. रवी सातभाई (संघटन सचिव), डॉ. त्र्यंबक पाटील, आणि डॉ. बाबासाहेब शेप, उपाध्यक्ष, डॉ. शांता



डॉ. प्रभाकर देव (नांदेड) – "स्वर्गीय श्री. मोरोपंत पिंगळे शैक्षणिक कार्य गौरव पुरस्कार"



डॉ. राजेंद्र नन्नवरे (जळगाव) – "स्वर्गीय हरिभाऊ वाकणकर शिक्षक पुरस्कार"



श्री. हेमंत पोखरणा (कडा, जि. बीड) –"स्वर्गीय डॉ. सतीश मित्तल संघटनात्मक (असोसिएशन) पुरस्कार"



श्री. सु. ग. जोशी (लातूर) – "श्री. बाबासाहेब आपटे ज्येष्ठ इतिहास संशोधक पुरस्कार"

जाधवर, महिला प्रमुख, डॉ. गणपत गट्टी, संपर्क प्रमुख, बाळासाहेब गीते, कायदेविषयक सल्लागार, प्रा. शशिकांत पसारकर, कोषाध्यक्ष, डॉ . पुष्कर शास्त्री, बौध्दिक प्रमुख, डॉ . जगदीश बियाणी, लेखन प्रमुख, डॉ. हरी जमाले, निमंत्रित सदस्य, डॉ. गीतांजली बोराडे, सदस्य, डॉ. मोहिनी उपासनी, सहमहिला प्रमुख यांचा यामध्ये सहभाग असून सर्वांनी एकमताने वरील नावावर शिक्कामोर्तब केले आहे.

अधिवेशनाच्या यशस्वी आयोजनासाठी श्री सिद्धेश्वर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. मुकुंद देवर्षी हे निमंत्रक, डॉ. जी.पी. फसले (आयोजक सचिव) आणि प्रा. डॉ.के.के. मालू (सहसंयोजक). महाविद्यालयातील इतिहास विभागाच्या परिश्रमातून हे अधिवेशन इतिहासप्रेमींसाठी एक वैचारिक पर्वणी ठरणार आहे.

या अधिवेशनात राज्यभरातून आणि देशाच्या विविध भागातून इतिहास संशोधक, अभ्यासक, विद्यार्थी आणि विचारवंत सहभागी होणार असून, भारतीय परंपरेवर आधारित इतिहास लेखनाला चालना देण्याच्या दृष्टिकोनातून हे अधिवेशन ऐतिहासिकदृष्ट्या महत्त्वाचे ठरणार आहे. यानिमित्ताने ज्ञान, संशोधन आणि सांस्कृतिक संवाद यांचे त्रिसूत्री साध्य होणार असून, पुण्यश्लोक अहिल्यादेवींच्या कार्याचा दीप पुन्हा एकदा उजळणार आहे.

# मंगळागौरी पूजन .. एक सुंदर व्रत :

ज्योतिर्मय साहित्य

श्रावण महिना जवळ आला की सर्व महिलांची लगबग सुरु होते. कारण रिमझिम पडणारा पाऊस, हिरवागार गालीचे अंथरून त्यावर रंगीबेरंगी फुलांची सुंदर वेलबुट्टी ,सप्तरंगी इंद्रधनुष्याची सुंदर कमान असा नयनांचे पारणे फेडणारा, आकर्षक निसर्ग! त्यात मनसोक्त न्हाऊन भटकंती करून निसर्गाच्या या बदलत्या सुंदर मोहक रूपाचे दर्शन घेण्याची ओढ तर मनात असतेच,पण त्याच बरोबर सणासुदीची पण धामधूम असते. मग स्वच्छता,सजावटी,स्वतः नटूनथटून देवाना पण अभिषेक,निसर्गातील सुंदर रंगीबेरंगी फुले,

पाने समर्पित करुन,कापसाची माळावस्त्रे घालुन सुंदर सजावायचे. मग तऱ्हेतऱ्हेचे खमंग, गोडधोडाचे पदार्थ,पक्वान्ने बनवून, फराळाचे पदार्थ बनवून नैवेद्य दाखवायचा, धूपदीप, कर्पूर चंदन,अत्तर यांनी सारा परिसर गंधित,पवित्र करायचा.शेवटी आळवून ,ओवाळून,आरत्या म्हणून प्रार्थना करून सर्वांच्या सौख्यासाठी वरदान मागायचे. या नुसत्या वर्णनानेच किती आनंददायक चित्र डोळ्यांसमोर येऊन चित्त प्रसन्न झाले ना?

श्रावणी सोमवार,शुक्रवार,जिवतीचे पूजन,व्रते, काही लोकांकडे पहिल्या शुक्रवारी एका गौरीचे

आगमन सुद्धा होते. मग सवाष्ण,कुमारिका, भोजने,अगदी घरोघरी सत्यनारायण पूजासुद्धा होतात. पण या व्यतिरिक्त या महिन्याचे खास वैशिष्टय किंवा मुख्य आकर्षण म्हणजे मंगळागौरीचे पूजन!खास नववधूच्या साठीच बनलेला हा आनंद महोत्सव!

श्रावण महिन्यातील चारही मंगळवारी सलग पाच वर्ष ही मंगळागौर पूजिली जाते. मंगळागौरी म्हणजे पार्वती! शंकराची पत्नी.. अन्नपूर्णा! मंगल करणारी अशी ही देवी! तिची पूजा मनोभावे अखंड सौभाग्यासाठी करतात. नवीन लग्न झालेल्या मुली पहाटे उठून अभ्यंग स्नान करून निरनिराळी फुले, आघाडा,दुर्वा, तुळशीपत्रे, केवडा,माका यासहित सोळा प्रकारच्या सोळा सोळा पत्री गोळा करून चौरंग मांडून भोवती सुंदर रंगीत रांगोळी काढून पूजेचे सर्व साहित्य जमवून मंगळागौरीचे , अन्नपूर्णेचे पूजन मनोभावे करतात. पुरणाचा,खिरीचा नैवेद्दय दाखवून न बोलता जेवतात. दुपारी कींवा रात्री पारंपारिक खेळ खेळून जागरण करतात.

साधी फुगडी, एका हाताची फुगडी, त्रिफुला फुगडी, चौफुला फुगडी, दंड फुगडी, कंबर फुगडी, गुडघ्याची फुगडी, केरसुणी फुगडी, जाते फुगडी, बस फुगडी, भुई फुगडी किंवा बैठी फुगडी, कासव फुगडी, पाट फुगडी, लोळण फुगडी, लाटणे फुगडी आणि फुलपाखरू फुगडी असे फुगडीचे अनेक प्रकार खेळले जातात. फुगडीनंतर दोन-तीन प्रकाराचा झिम्मा, तळ्यात-मळ्यात, खुर्ची का मिर्ची, नाच गं घुमा, आटुंश पान, तिखट मीठ मसाला, तांदूळ सडू बाई, कीस बाई कीस.. दोडका कीस, आगोटं-पागोटं, कोंबडय़ाचे तीन-चार प्रकार, आळुंकी-साळुंकी, सासू-सुनेचे अथवा सवतींचे भांडण, आवळा वेचू की कवळा वेचू, किकीचे पान, माझी आई मोठी की तुझी आई मोठी, नखोल्या, ताक, सोमू-गोमू, काच-किरडा, धोबीघाट, होडी, मासा, भोवर भेंडी, अडवळ घूम, पडवळ घूम, गोफ असे मजेदार व प्रसंगी मिश्कील खेळ रंगत खेळतात

संध्याकाळी भाजणीचे वडे,मुगाच्या डाळीची भाजून केलेली खिचडी, मटकीची उसळ, लाडू चिवडा, चकली असे फराळाचे पदार्थ खातात.

दुसऱ्यादिवशी सकाळी पुन्हा स्नान करून उत्तरपूजा करून दहिभाताचा नैवेद्य दाखवून या पूजेचे विसर्जन करतात.

याचे उद्यापण सुद्धा अशीच मंगळागौर पूजन करून पाचवर्षानंतर



आईला एका भांड्यात चांदीच्या नागाची प्रतिमा ठेवून त्याचे तोंड कापडाने झाकून दिले जाते. तिला सौभाग्यवाण्

आणि साडीचोळी दिली जाते. आणि आशीर्वाद घेऊन याची समाप्ती होते. असे होते मंगळागौरी

पूजन!

ही पूजा म्हणजे नववधुवर केलेले एकप्रकारचे सामाजिक,कौटुंबिक भान देणारे संस्कारच !

शिव पार्वती प्रमाणे कायम आदर्श जोडीने, एकीने एकमेकांवरील प्रेम, विश्वास दृढ ठेवून निष्ठेने आदर्श संसार करावा, कुटुंबव्यवस्था जपावी, नववधूला. सर्व नातलगांची ओळख होऊन आपुलकी,माया,प्रेम उत्पन्न व्हावा , आणि एकीतील आनंद कळावा तो तिने आत्मसात करावा ही यामागील भावना आहे.

मनोरंजन म्हणून खेळ खेळत गाणी म्हणण्यामुळे मजा तर येतेच,पण नातलगाविषयीच्या भावनाही व्यक्त करता येऊन मन हलके होते. सासरच्या खाष्ट लोकाना नाजुक चिमटे सुद्धा यातून हसत हसत घेता येतात. खेळताना स्वयंपाक घरातील वस्तूंचा सूप,लाटणे, घागर,करवंटी, गोफ अशा साधनांचा वापर केलेला असतो. या गीतांतून नवविवाहितेच्या मनातील सुख दु:खाच्या भावना, विचारच प्रगट होतात.हे खेळ म्हणजे सर्वांगाला व्यायाम देणारे असतात. ती एक प्रकारची आसनेच आहेत. महिलांना घरातली कामांबरोबर मनोरंजन, आनंद मिळावा या हेतूने गाण्याची जोड देऊन हे खेळ खेळले जातात. हे जिम्नॅस्टिकच आहे. मनाची एकाग्रता, शरीराची लवचिकता, नेम साधणे हे सर्व आजच्या ॲरोबिक्सप्रमाणे गीतांच्या तालावर, ठेक्यावर खेळले जातात.

मनोरंजन आणि व्यायाम यातून आरोग्य उत्तम राहते.

पूर्वी मुलींची खूप लहान वयात लग्न होत असत त्यांना नातेवाईक, औषधी वनस्पती, निसर्गाची ओळख हसत खेळत व्हावी, त्यान्चे जतन व्हावे, मनोरंजन व्हावे ,एकीची भावना त्यांच्या मनात रुजावी आणि त्याच बरोबर आपल्या हिंदू धर्मातील देव,धर्माची माहिती व्हावी हा मुख्य उद्देश होता ही मंगळागौर साजरी करण्यामागचा. पण आता काळ बदलला आहे. मुलींची लग्ने शिक्षण,करिअर यामुळे खूप उशीरा



सौ. स्नेहा मुसरीफ
पुणे

होत आहेत माणसे ओळखण्याइतक्या त्या सक्षम असतात.नोकरीमुळे त्यांना इतका वेळ या पूजेसाठी देणे शक्य होत नाही. हे सर्व खरे असले तरीही काही गोष्टी, परंपरा आपण आपल्यासाठी जपल्याच पाहिजेत असे मला वाटते. आता पुजेचे सर्व साहित्य ऑनलाईन मिळते त्यामुळे ते आणायला जाण्याचीही गरज नाही. हॉल,केटरर्स सर्व तयार मिळते. फक्त पैसे दिले की बस्स! ते तर दररोजच कमावतो. मग त्यातून थोडासा आनंद, विरंगुळा घेतला तर समाधानच वाटेल ना? तर्हेतर्हेची फुले,पत्री पाहून मन प्रसन्न होईल, एकत्र भेटीमुळे वेगळा आनंद, उत्साह वाढेल.

आरोग्य उत्तम रहावे यासाठी आरोबिक्स,झुंबा, जिम करण्या ऐवजी एखादा दिवस वेगळे मंगळागौरीचे खेळ खेळून पहा तरी? त्यापेक्षा सुंदर आणि हसत खेळत सर्वांगीण व्यायाम नक्कीच मिळेल. आता खास मंगळागौरीच्या खेळ खेळण्याची कॉन्ट्रॅक्टस घेतली जातात. भरमसाठ पैसे मोजतात त्यासाठी. त्या खेळ खेळतात आणि बाकीच्यांनी ते फक्त पहायचे. पण यात स्वतः खेळण्याची मजा येतच नाही. म्हणजे त्यांना पैसे द्यायचे आणि त्यांनी खेळून मिळवलेला आनंद आपण फक्त पाहायचा असे झाले हे! जमेल तसे,जमेल तेवढे खेळ खेळा,पण स्वतः ते खेळून त्याचा खरा आनंद घ्या. या मंगलमय वातावरणात मंगळागौर पुजून, खेळून मनसोक्त आनंद लुटा. मंगळागौरी नक्कीच तुम्हाला भरभरून आशीर्वाद देईल.

आपल्या संस्कृती आणि रूढी परंपरांचे जतन करणे ही सुद्धा आपलीच जबाबदारी आहे ना!

हे जरनल संपादक व प्रकाशक संजय व्यापारी यांनी १०१, सी विंग, सिल्व्हर स्पेस सोसायटी, विशाल नगर, पिंपळे निलख, पुणे-४११००१ (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. (पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.
या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद पुणे न्यायालयाच्या कक्षेत) E-mail-jyotirmaysahitya@gmail.com, Mob. 7743918559